महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एमआयएस-०१२४/प्र.क्र.१०२/२०२५/जाहिरात दिनांक : २६ सप्टेंबर, २०२५

# -: शुद्धिपत्रक :-

**विषय :-** **<u>परीक्षेच्या आयोजनाच्या सुधारित दिनांकाबाबत</u>**
महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा – २०२५,
जाहिरात क्रमांक: ०१२/२०२५, दिनांक १८ मार्च, २०२५

**संदर्भ :-** शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:मलोआ-११२५/प्र.क्र.२३६/मलोआ, दिनांक २६ सप्टेंबर, २०२५

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उपरोक्त जाहिरात प्रसिद्ध करण्यात येऊन प्रस्तुत परीक्षा दिनांक २८ सप्टेंबर, २०२५ रोजी राज्यातील ३७ जिल्हाकेंद्रांवरील ५२४ उपकेंद्रांवर उपकेंद्रांवर घेण्यात येणार होती. तथापि, राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये निर्माण झालेल्या पूरजन्य परिस्थितीमुळे अनेक जिल्ह्यातील विविध गांवाचा, तालुक्यांचा एकमेकांशी संपर्क तुटलेला आहे. तसेच राज्यातील हवामान खात्याने पुढील काही दिवसांत अतिवृष्टीचा इशारा दिला असून अशा परिस्थितीत कोणताही उमेदवार परीक्षेपासुन वंचित राहू नये यासाठी शासनाने पत्र क्रमांक मलोआ-११२५/प्र.क्र.२३६/मलोआ, दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ अन्वये केलेल्या विनंतीनुसार प्रस्तुत परीक्षा नियोजित तारखेस न घेता पुढे ढकलण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे.

**२.** सदर निर्णयानुसार **महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा - २०२५**, दिनांक २८ सप्टेंबर, २०२५ ऐवजी **सुधारित दिनांकास म्हणजेच दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२५** रोजी घेण्यात येईल.

**३.** उपरोक्त परीक्षेच्या दिनांकातील बदलामुळे दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२५ रोजी घेण्यात येणारी पूर्वनियोजित महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२५ चा सुधारित दिनांक शुद्धिपत्रकाद्वारे स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

उपसचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई